# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com


**अत्यंत महत्त्वाचे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/संच मान्यता/२०१७/3266

दिनांक :- 18 MAY 2017

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलंग्न कनिष्ठ महाविद्यालय, अहमदनगर/पुणे/सोलापूर

**विषय :-माध्यमिक शाळेस जोडून उच्च माध्यमिक असल्यास व माध्यमिक कडील पद अतिरिक्त होत असल्यास अशा शाळांच्या संच मान्यता ऑफ लाईन पध्दतीने देण्याबाबत...**

**संदर्भः-१)शासन निर्णय क्र एसएसएन/२०१५/प्र.क्र.१६/टिएनटी-२ दि.२८.०८.२०१५.**
**२)मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र.उमाशा/संचमान्यता /माध्य/३०७/२०१० दि.१५.०५.२०१७.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता पुर्ण झालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पुर्वी उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यभार माध्यमिक विभागाकडे देवून माध्यमिक विभागाकडील शिक्षक पुर्णवेळ होत असेल तर त्यास उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार दिला जात होता. त्याचप्रमाणे माध्यमिक विभागाकडे कार्यभार उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडे देवुन एकदा शिक्षक पुर्णवेळ होत असेल तर त्यास माध्यमिक विभागाचा कार्यभार देवून पुर्णवेळ पद देता येत होते. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑनलाईन पध्दतीने आणि उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयाच्या संच मान्यता ऑफ लाईन पध्दतीने दिल्या असल्यामुळे माध्यमिक विभागाचा कार्यभार माध्यमिक विभागाकडे आणि उच्च माध्यमिक विभागाचा कार्यभार उच्च माध्यमिक कडे कायम ठेवल्यामुळे माध्यमिक विभागात शिक्षक अतिरिक्त होत आहे.

संदर्भिय शासन पत्र क्र-२ नुसार सद्यस्थितीत देण्यात आलेला उच्च माध्यमिकचा कार्यभार देवून कार्यरत कर्मचा-याच्या मर्यादित सुधारित संच मान्यता ऑफलाईन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. **शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यभार न दिल्यामुळे अतिरिक्त ठरत असतील तरच अशा माध्यमिक सलग्न उच्च माध्यमिक विद्यालयांनी** त्यांचे फेर प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावेत.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी सविनय सादर

sanch manyata 2016-17